# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**नागपूर प्रादेशिक मनोरूग्णालयात मनोरुग्णांचे झालेले मृत्यू**

**(१) ६५६७१ (२७-०१-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर प्रादेशिक मनोरूग्णालयात मागील ८ महिन्यात ११ रूग्णांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भरारी पथकाने रूग्णालयात भेट दिली असता तेथे अनेक त्रूटी निर्देशनास आल्या आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांनी रूग्णांना मारपीट केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय असल्यास, चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०९-२०१८) :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

(४) प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपुर येथे मागील ९ महिन्यात म्हणजेच मे २०१६ ते जानेवारी २०१७ पर्यत एकुण २५ रुग्णांचा मृत्यु झालेला असुन सदर रुग्णापैकी १६ रुग्ण शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, नागपुर येथे गंभीर आजार तसेच वयोवृध्द असल्याने उपचारा दरम्यान मृत्यु पावले १ रुग्ण इंदीरा गांधी शासकीय रुग्णालय, नागपूर येथे व ८ रुग्ण प्रादेशिक मनोरुग्णालय नागपूर येथे मृत्यु पावले आहेत. या सर्व मृत्युचे शवविच्छेदन तसेच तहसिलदार करवी पंचनामा करण्यात आला आहे.

मनोहर आहूजा रुग्णाचा दि.२९/८/२०१६ रोजी मृत्यू झाला होता. शवविच्छेद अहवालानुसार त्याच्या अंगावर जखमा होत्या तथापि त्याचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाला आहे असे अहवालात नमुद आहे.

तसेच या सर्व मृत्यूची सखोल चौकशी पोलीस आयुक्त व जिल्हा न्यायाधिशां मार्फत करण्यात येत आहे. याबाबतचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही, अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर येथील मध्यवर्ती रुग्णालयात**
**रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(२) ६७९१४ (२७-०१-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर येथील मध्यवर्ती रुग्णालय परिसरात अस्वच्छतेमुळे दुर्गंधी पसरल्याने रुग्णालयातील रुग्ण तसेच उपचाराकरिता येणाऱ्या रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडे रुग्णांनी तसेच त्यांच्या नातेवाईकांनी माहे ऑक्टोंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान तक्रारी करून सुद्धा कोणतीच कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०९-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

सदर रुग्णालयातील अस्वच्छतेबाबत ऑक्टोंबर २०१६ च्या दरम्यान रुग्ण अथवा त्यांचे नातेवाईकाकडून रुग्णालय प्रशासनाकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. रुग्णालयामध्ये उपलब्ध असलेल्या एकुण ८ कर्मचा-यांकडुन रुग्णालयाची वेळोवेळी साफसफाईची कामे करुन घेण्यांत येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**जुन्नर (जि. पुणे) तालुक्यातील मांडवी नदीवर कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा बांधण्याबाबत**

**(३) ७५६५० (१५-०४-२०१७). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील ओतूर, रोहकडी, आंबेगव्हाण, पाचघर, चिल्हेवाडी, अहिनवेवाडी आणि मांदारणे या गावाची पाणीटंचाई दूर करण्यासाठी मांडवी नदीवर तसेच पाचघर याठिकाणी मेगाळवाडी येथे कोल्हापूरी पध्दतीचे बंधारा बांधण्याबाबतचे एक निवेदन मांडवी नदी पाणी हक्क बचाव कृती समितीने तसेच ग्रामपंचायत, आंबेगव्हाण-पाचघर यांनी मा. जलसंपदा व मा. जलसंधारणमंत्री यांचेकडे दिनांक २४ मार्च २०१६ रोजी वा त्या सुमारास सविस्तर निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृती समितीच्या मागणीसंदर्भात दिनांक १६ मार्च २०१५ रोजी मा. जलसंपदा राज्यमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात संबंधित अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच कृती समितीचे पदाधिकारी यांचे समवेत एक बैठकही संपन्न झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू बैठकीत कृती समितीच्या ८ मागण्या तत्त्वत: मान्य केल्या असून दोन ठिकाणी कोल्हापूरी बंधारे बांधण्यासही मान्यता दिलेली असतानाही याप्रकरणी शासनाकडून कोणतीही कारवाई न झाल्यामुळे दिनांक २३ ऑगस्ट २०१६ रोजी पुन्हा स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. जलसंपदा राज्यमंत्री यांचेकडे निवेदन सादर करून सदरहू बैठकीत मान्य केलेल्या निर्णयाची त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी, असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, कृती समितीच्या मागण्याबाबत अंमलबजावणी करण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) असल्यास, कृती समितीच्या सदरहू बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाची विनाविलंब अंमलबजावणी होवून सदरहू दोन्ही ठिकाणचे कोल्हापूरी बंधारे बांधण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२७-०९-२०१८) :** (१), (२) व (३) होय.

(४) व (५) मांडवी नदीवर आंबेगव्हाण (पाचघर आमराई) या ठिकाणी को.प. बंधाऱ्याचे सविस्तर सर्वेक्षण करुन रु.२३७.७१ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. प्रस्तावित को.प.बंधाऱ्याची साठवण क्षमता १४०.८० स.घ.मी. इतकी असून प्रति स.घ.मी. किंमत १,६८,८२८/- इतकी येत आहे. प्रचलित मापदंडानुसार प्रति स.घ.मी. किंमत रु.१,४३,०४८/- इतकी आहे. त्यामुळे सदर योजना आर्थिक मापदंडात सफल होत नसल्याने पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच रोहकडी (वाघदरी चोंडीओढा) या ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट बंधारा योजनेसाठी सविस्तर सर्वेक्षण करुन रु.३२.०५ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. प्रस्तावित सिमेंट कॉंक्रीट बंधाऱ्याची साठवण क्षमता २१ स.घ.मी. इतकी असून प्रति स.घ.मी.किंमत १,५२,६१९/- इतकी येत आहे.प्रचलित मापदंडानुसार प्रति.स.घ.मी. किंमत रु.४,४३,०४८/- इतकी आहे. त्यामुळे सदर योजना आर्थिक मापदंडात सफल होत नाही.

---

## डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय, उप जिल्हा रुग्णालय तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांची झालेली दुरवस्था

**(४) ७८३५५ (१८-०४-२०१७). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यात २ ग्रामीण रुग्णालय, उप जिल्हा रुग्णालय तसेच ९ प्राथमिक आरोग्य केंद्र असून गेल्या अनेक वर्षापासून रुग्णालयात सिटी स्कॅन मशिन, सोनोग्राफी मशिन, रक्त साठा, औषध साठा उपलब्ध नसून तज्ञ वैद्यकिय अधिकारी देखील नसल्यामुळे परिसरातील सुमारे ७० टक्के गोरगरीब आदिवासी रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नसल्याने त्यांना उपचारासाठी गुजरात राज्यात जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयात आधुनिक सुखसोई उपलब्ध नसल्यामुळे रुग्णाला गंभीर आजार किंवा मोठा अपघात झाल्यास रुग्णाला वापी, सिलव्हासा किंवा वलसाड येथील रुग्णालयात जावे लागते पण हे अंतर दुरचे असल्यामुळे रुग्ण पोहचण्यास उशिर होत असल्याने रुग्णांचा वाटेत मृत्यू होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई, अहमदाबाद मार्गावर मध्यवर्ती ठिकाण निवडण्यात येऊन तेथे सर्व सोईयुक्त सुसज्ज रुग्णालय बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी गेली २० वर्षे आरोग्य विभाग तसेच आदिवासी विकास विभाग यांच्याकडे तक्रारी तसेच लेखी निवेदने देत असून आजतागायत कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन गोरगरीब जनतेकरिता बऱ्याच वर्षापासून प्रलंबित असलेले नवीन रुग्णालय बांधण्यास मंजूरी देण्याबाबत कोणते प्रयत्न केले वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०९-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे. आरोग्य संस्थेना उपलब्ध करुन द्यावयाच्या वैद्यकीय उपकरणांच्या निकषानुसार उपजिल्हा रुग्णालय, डहाणू येथे सोनोग्राफी मशीन कार्यरत असून सीटी स्कॅन मशीन अनुज्ञेय नाही. तसेच याठिकाणी रक्त साठवणूक केंद्र कार्यरत असून तेथून रुग्णांना रक्ताचा पुरवठा करण्यात येत आहे. सदर रुग्णालयासाठी आवश्यक असलेला औषधसाठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे. सर्व रुग्णांना उपलब्ध असलेल्या सर्व आरोग्यविषयक सुविधा पुरविल्या जात आहेत. गंभीर स्वरुपाच्या रुग्णांना आवश्यकतेनुसार जिल्हा रुग्णालयात संदर्भित केले जाते. उप जिल्हा रुग्णालय डहाणू साठी मंजूर असलेले वैद्यकीय अधिक्षक १ पद, वैद्यकीय अधिकारी १३ पदे अशी मिळून एकूण सर्व १४ पदे भरलेली असून एकही पद रिक्त नाही.

(२) हे अंशत: खरे आहे. गंभीर व अत्यवस्थ रुग्णांना प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारांसाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात संदर्भित केले जाते. तथापि वापी, सिलवासा व वलसाड परिसरातील रहिवासी यांना उपचारासाठी सोयीचे वाटत असल्याने अशा रुग्णांना त्यांच्या विनंतीवरुन वापी, सिलवासा व वलसाड येथे संदर्भित केले जाते.

(३) व (४) डहाणू येथील ट्रॉमा केअर सेंटरचे बांधकाम पूर्ण झाले असून हस्तांतरण प्रक्रिया सुरु आहे. मनोर येथे २०० खाटांचे रुग्णालय व ट्रॉमा केअर सेंटर बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. पालघर येथे जिल्हा रुग्णालय सुरु करण्यास मान्यता देण्यात आली असून जागा उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयाची इमारत सर्व सोयी सुविधायुक्त उभारण्याबाबत**

**(५) ८२३७३ (१५-०४-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयाची इमारत सर्व सोयी सुविधा युक्त उभारण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २४ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सद्यस्थितीत विविध विभागामधील इमारतीत रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे सुविधावर ताण येऊन रुग्णाची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय
(३) तसेच अपघातग्रस्तांवर तातडीचे उपचार करण्याच्या अत्याधुनिक सुविधा येथे नसल्याने रुग्णांना मुंबई व अन्यत्र पाठविले जाते, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयामध्ये येणा-या आंतररुग्ण व बाहयरुग्ण यांना आवश्यक त्या वैद्यकीय सुविधा तातडीने पुरविल्या जातात. उपचाराअभावी कोणत्याही रुग्णांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेतली जाते.
(३) अपघातग्रस्तांवर तातडीने उपचार केले जातात परंतु रुग्णांस न्युरो सर्जरी सारख्या सेवेची आवश्यकता असल्यास मुंबई येथे शासकीय / निमशासकीय, वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्नीत रुग्णालये व सुपरस्पेशालिटी रुग्णालयामध्ये संदर्भित केले जाते.
(४) ठाणे येथील जिल्हा रुग्णालयाचे ३०० खाटावरुन ५७४ खाटांमध्ये रुग्णालयाचे सुपरस्पेशालिटी सुविधेसह श्रेणीवर्धन करण्याचा प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुसेगाव (जि.सातारा) येथील सिमेंट बंधारे व माती**
**बंधाऱ्यांची झालेली दुरावस्था**

**(६) ८२८३८ (१८-०४-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसेगाव (जि.सातारा) येथील श्री सेवागिरी देवस्थान ट्रस्टतर्फे सन २००३ मध्ये ओढयांवर बांधण्यात आलेले २९ सिमेंट बंधारे व ४ माती बंधाऱ्यांची दुरावस्था झाल्याने पाणी साठवण क्षमता कमी झाली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे या बंधाऱ्यांची दुरुस्ती करणे गरजेचे झाले असून त्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी सदर ट्रस्ट व ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करुन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवेदनाची दखल घेऊन शासनाने या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२३-०८-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सन २००३ मध्ये श्री.सेवागिरी देवस्थान स्ट्रस्ट, पुसेगाव यांचेमार्फत पुसेगाव येथील ओढ्यावर २९ सिमेंट बंधारे व चार माती बंधारे बांधण्यात आले आहेत. सदर कामे ट्रस्टने शासनाच्या कोणत्याही विभागाकडे हस्तांतरीत केलेले नसल्यामुळे त्या कामांच्या दुरूस्तीस शासनाकडून निधी उपलब्ध करणे शक्य होत नाही. सदर बंधारे ट्रस्टने स्वनिधीतून दुरूस्त करावे अथवा जलसंधारण विभागाकडे देखभाल दुरूस्तीसाठी हस्तांतरीत करावे अशी सेवागिरी देवस्थान ट्रस्टला विनंती करण्यात येत आहे.

---

**मौजे वाशेरे (ता.खेडे, जि.पुणे) येथे बामनझुरा या ठिकाणी पाझर तलाव करण्याबाबत**

**(७) ८८७०८ (२१-०८-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वाशेरे (ता.खेडे, जि.पुणे) या गावातील पाण्याची तीव्र टंचाई दूर करण्यासाठी बामनझुरा या ठिकाणी पाझर तलाव करण्याची आवश्यकता असल्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १० एप्रिल,२०१७ रोजी वा त्यासुमारास मा.,जलसंपदा राज्यमंत्री यांचेकडे पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने अंदाजपत्रकानुसार निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२४-०८-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करुन कामाचा समावेश सन २०१८-१९ च्या जिल्हा वार्षिक योजना सर्व साधारण प्रारुप आराखड्यात केलेला असून आराखडा जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती, पुणे यांचेकडे दिनांक ९/१०/२०१७ रोजी सादर केलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई-विरार महानगरपालिकेच्या हद्दीतील प्राथमिक आरोग्य केंद्रे व शासकीय रुग्णालय महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याबाबत**

**(८) ९०९९८ (१९-०८-२०१७). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिकेच्या हद्दीतील प्राथमिक आरोग्य केंद्रे व शासकीय रुग्णालय महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात यावी अशी मागणी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय

(२) तसेच, सहसंचालक, आरोग्य सेवा (प्रा.आ.केंद्र, जि.प.स्तर) मुंबई यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र, नवघर, (ता.वसई) हे तत्कालिन नवघर माणिकपूर नगरपरिषदेकडे हस्तांतरीत करण्यास शासन निर्णय क्र. पीएचसी/११००/२६८/प्र.क्र. ७४/आरोग्य-४, दि. ११-६-२००२ नुसार मंजुरी दिलेली असल्याचे व हस्तांतरण करण्याबाबत अटी व शर्ती काय असाव्यात याबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येणार असल्याचे लेखी कळवूनसुध्दा याबाबत अंतिम कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. वसई-विरार महानगर पालिकेच्या हद्दीतील प्राथमिक आरोग्य केंद्र व शासकीय रुग्णालय महानगर पालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबतच्या अटी व शर्तीचा संयुक्त मसुदा अंतिम करण्याबाबतची कार्यवाही आरोग्य संचालनालय स्तरावर सुरु आहे.

(३) (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देउळगांव राजा (जि. बुलडाणा) येथील ट्रामा केअर सेंटर कार्यान्वीत न झाल्याबाबत**

**(९) ९२७८९ (२१-०८-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देउळगांव राजा (जि.बुलडाणा) शहरातील महामार्ग लगत चार वर्षापासून बांधलेले ट्रामा केअर सेंटर अदयापही कार्यान्वीत झाले नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे गत पाच वर्षाच्या कालावधीत सुमारे पाचशे अपघाग्रस्तांचा या मार्गावर मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करून सदर सेंटरमध्ये आवश्यक तज्ञ डॉक्टर, अत्याधुनिक आरोग्य उपकरणे व सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२६-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

महामार्गावर झालेल्या अपघातात जखमी झालेल्या रुग्णांना ट्रामा केअर युनिट, देऊळगांव राजा येथे प्राथमिक उपचार करुन गरजेनुसार पुढील उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय, देऊळगांव राजा येथे स्थलांतरीत करण्यात येते. तसेच अत्यावश्यक परीस्थितीत गंभीर रूग्णांना जिल्हयाच्या ठिकाणी वा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला येथे पुढील उपचाराकरीता संदर्भित करण्यात येते.
(३) ट्रामा केअर सेंटर, देऊळगाव राजा येथे वैद्यकीय अधिकारी गट -२ यांची दोन पदे व अस्थिव्यंग शल्य चिकित्सक चे १ पद भरलेले असून बधिरीकरण शास्त्रज्ञ ची २ रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच अत्याधुनिक आरोग्य उपकरणे साधनसामुग्री प्राप्त झालेली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौ.दातील (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र मंजूर करण्याबाबत**

**(१०) ९२९१८ (२१-०८-२०१७). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिन्नर तालुक्याची भौगोलिक परिस्थिती, वाढती लोकसंख्या व औद्योगिकीकरणामुळे मौजे दातली (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथे नव्याने प्राथमिक आरोग्य उपकेंद्र मंजूर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ मे २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.आरोग्य मंत्री यांचेकडे पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी नव्याने प्राथमिक आरोग्य उपकेंद्र मंजूर करणेकरिता विहित नमुन्यातील प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२६-०९-२०१८) :** (१) अंशःत खरे आहे.
मौजे दातली, ता.सिन्नर,जि.नाशिक येथे नव्याने प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करणेबाबत दि.२६.०१.२०१६ रोजी ग्रामसभेने ठराव मंजूर केला आहे.
(२) व (३) सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत आरोग्य संस्थांचा जोड बृहत आराखडा तयार करण्यात येत असून सदरचे ठिकाण जोडबृहत आराखड्यामध्ये निकषानुसार प्रस्तावित करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पथ्रोट (ता.अंजनगाव (सुर्जी), जि.अमरावती) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीची झालेली दुरावस्था**

**(११) ९२९५७ (२१-०८-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पथ्रोट (ता.अंजनगाव (सुर्जी), जि.अमरावती) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आजूबाजूच्या ४२ गावातील रुग्ण उपचाराकरीता येत असूण सदर केंद्राची इमारत अत्यंत जिर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारत बांधकामाचे उद्घाटन मा.पालकमंत्री अमरावती यांच्या हस्ते माहे जानेवारी २०१७ मध्ये झाले असून अद्याप पर्यंत प्रत्यक्षात कामाला सुरवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधीत कंत्राटदारावर जिल्हा परिषद प्रशासनाने कोणती कारवाई केली वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकामासाठीच्या निविदा स्वीकृतीचे अधिकार जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेला आहेत. सदर कामास सर्वसाधारण सभेची मंजूरी प्राप्त न झाल्याने कंत्राटदाराला कार्यारंभ आदेश अद्याप देणे शक्य झाले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे रोहिणखेड व कोथळी (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील प्राथमिक आरोग्य केद्राचा प्रस्ताव प्रलंबीत असल्याबाबत**

**(१२) ९२९८३ (२१-०८-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा)** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील आरोग्य विषयक दोन हजार खाटांचा अनुशेष लक्षात घेता बुलढाणा जिल्हयातील मोताळा तालुक्यात सन २०११ च्या जनगणनेनुसार प्राथमिक आरोग्य केंद्राचा अनुशेष प्रलंबित असल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनुशेष भरून काढण्यासाठी मौजे रोहिणखेड व कोथळी (ता. मोताळा, जि. बुलढाणा) येथील नविन प्राथमिक आरोग्य केंद्राचा प्रस्ताव उपसंचालक आरोग्य सेवा यांनी शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव प्रलंबीत असून आरोग्य विषयक अनुशेष दूर करण्यासाठी संबंधीत विभागाकडून दूर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्राचा प्रस्तावास मंजूरी देण्यासाठी शासानाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येते आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२६-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

अनुशेष निर्देशांक समितीच्या अहवालानुसार विदर्भातील ११ जिल्ह्यांमध्ये एकूण ३३८१ खाटांचा अनुशेष दूर करण्यात आला असून सद्यस्थितीत विदर्भामध्ये खाटांचा अनुशेष शिल्लक नाही.

(२), (३), (४) व (५) मौजे रोहिणखेड व कोथळी, तालुका मोताळा येथे दि. २५.०७.२०१७ च्या शासन निर्णयान्वये प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. त्यापैकी रोहिणखेड येथील ग्रामपंचायतीकडील जागा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. बुलढाणा यांच्या नावे हस्तांतरीत करण्याची कार्यवाही सुरू आहे. मौजे कोथळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राकरीता जागा अद्याप प्राप्त झालेली नाही.

---

**नाशिक येथील जिल्हा शासकीय रुग्णालयास दिलेले ब्रेस्ट कॅन्सर डिटेक्टरच्या यंत्राचा वापर खाजगी रुग्णालयात होत असल्याबाबत**

**(१३) ९३४४२ (२१-०८-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील जिल्हा शासकीय रुग्णालयास गणपती फाऊंडेशन संस्थेकडून पालकमंत्रांना "ब्रेस्ट कॅन्सर डिटेक्टर" ची चार यंत्रे दिलेली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या चार यंत्रापैकी एका यंत्राचा वापर "प्रयाग" या खाजगी हॉस्पिटलमध्ये सुरु असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रयाग हॉस्पिटल कोणाच्या मालकीची आहे याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२६-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) नाशिक महानगरपालिका व जिल्हा रुग्णालय यांच्या पथकामार्फत चौकशी केली असता प्रयाग हॉस्पिटल हे डॉ. वर्षा लहाडे, स्त्रीरोग तज्ञ वैद्यकिय अधिकारी यांच्या मालकीचे असल्याचे आढळून आले आहे. सद्य:स्थिती सदरचे मशीन सिलबंद करण्यात आले आहे.
(४) डॉ. वर्षा लहाडे यांना दि. ११.०४.२०१७ रोजी निलंबित करण्यात आले आहे. तसेच प्रयाग हॉस्पिटल विरूद्ध बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट अंतर्गत म्हसरूळ पोलिस स्टेशन, नाशिक येथे , एमटीपी ॲक्ट व औषधे व सौंदर्यप्रसाधन कायद्यांतर्गत सरकारवाडा, पोलिस

ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून डॉ. वर्षा  लहाडे याना अटक करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे जिल्हा रुग्णालय नाशिक यांचेकडून सरकार वाडा, पोलीस स्टेशन, नाशिक यांच्याशी पत्रव्यवहार करुन डॉ.लहाडे यांच्याकडील मॅमोग्राफी मशीन ताब्यात घेण्याची कारवाई सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे टेंभीखोडावे, (ता.जि.पालघर) येथे पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्याबाबत**

**(१४) ९३४९६ (१९-०८-२०१७). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे टेंभीखोडावे (ता.जि.पालघर) येथे पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होत असल्याची बाब माहे एप्रिल २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, उक्त ठिकाणी साठवण/पाझर तलाव दुरुस्तीच्या कामासाठी निधीची मागणी लोकप्रतिनिधी शासनाकडे माहे डिसेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली होती, हेही खरे आहे काय.

(३) असल्यास, साठवण/पाझर तलाव दुरुस्तीसाठी शासनाकडून किती कालावधीमध्ये निधीची पुर्तता करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०५-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) मौजे टेंभीखोडावे येथे साठवण तलाव/पाझर तलाव नसल्याने दुरूस्तीचा प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि, मौजे टेंभीखोडावे येथे साठवण तलाव बांधण्याची बाब जिल्हा परिषद, पालघर यांचे विचाराधीन होती. मात्र ही योजना आर्थिक मापदंडात व लाभव्यय गुणोत्तरात बसत नसल्यामुळे पुढील कार्यवाही करण्यात आली नाही.

---

**मुंबईसह राज्यातील सर्व जिल्हयातील शासकीय रुग्णालये व जिल्हा रुग्णालयाना औषधांसाठी निधी कमी मिळत असल्याबाबत**

**(१५) ९६४११ (०६-०१-२०१८). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील सर्व जिल्हयातील शासकीय रुग्णालये व जिल्हा रुग्णालयाना औषधांसाठी मिळणारा निधी मागणीपेक्षा कमी मिळत असल्याने तसेच मागणीच्या केवळ २५ ते ३० टक्के औषधे मिळत असल्याने रुग्णांना पुरेशी आरोग्यसेवा व औषधे पुरविता येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार या प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (०७-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात गैरसोयीबाबत**

**(१६) ९७४४८ (२७-१२-२०१७). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेरळ (ता. कर्जत, जि.रायगड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान एका गरोदर महिलेला खाट नसल्याने तिला जमिनीवर झोपविण्यात आल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याचबरोबर अपुरा असलेला कर्मचारी वर्ग तसेच विद्युतपुरवठा नसल्याने डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.

माहे ०५ सप्टेंबर,२०१७ ते ०८ सप्टेबर, २०१७ या कालावधीत प्राथमिक आरोग्य केंद्रात १४ प्रसुती झालेल्या होत्या. प्राथमिक आरोग्य केंद्रात १० खाटा उपलब्ध असतात. या कालावधीत प्रसुती मातांची संख्या खाटांपेक्षा जास्त झाल्याने प्रसुतीपूर्व काळात तात्पुरत्या स्वरुपात जमीनीवर बेड टाकून त्यांची व्यवस्था करण्यात आली होती. प्रसुतीनंतर खाटांसह बेड उपलब्ध करुन देण्यात आलेले होते.

(३) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केद्रास मंजूर १५ पदांपैकी १४ पदे भरलेली आहेत. पुरुष परिचराचे ०१ पद रिक्त आहे. विद्युतपुरवठा खंडीत झाल्यास इन्व्हर्टर व सौरउर्जा संचाची व्यवस्था आहे. ग्रामपंचायत व हिवताप कार्यालयाकडून नियमित डासप्रतिबंधक फवारणी करण्यात येते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील मंजूर आरोग्य उपकेंद्रापैंकी निम्यांहून अधिक उपकेंद्रे बंद असल्याबाबत**

**(१७) ९७४४९ (२७-१२-२०१७). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील ३२ आरोग्य उपकेंद्रापैंकी निम्यांहून अधिक उपकेंद्रे बंद असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्जत तालुक्यातील बहुतांश भाग हा दुर्गम, डोंगर दऱ्या, घनदाट जंगलाचा असल्याने या भागांमध्ये सर्पदंशाच्या अनेक घटना घडत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा रुग्णांवर तातडीने उपचार घेण्यासाठी आरोग्य उपकेंद्रात सोय होणे अपेक्षित असूनही अनेकवेळा सदर केंद्र बंद असते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली, वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

कर्जत तालुक्यातील मंजूर असलेली सर्व ३८ उपकेंद्रे कार्यान्वित आहेत.

(२) हे खरे आहे.

माहे ऑक्टोबर २०१७ अखेर कर्जत तालुक्यात ३८ सर्पदंशांच्या घटना घडल्या असून त्यांचेवर उपचार केलेले आहेत.

(३) व (४) हे खरे नाही.

आरोग्य उपकेंद्रात सर्पदंशावर उपचार केले जात नाहीत. सर्पदंशाच्या रुग्णांवर प्राथमिक आरोग्य केंद्रात आणि वरीष्ठ रुग्णालयात उपचार करण्यात येतात.

कर्जत तालुक्यात ०६ प्राथमिक आरोग्य केंद्रे असून याठिकाणी सर्पदंशावरील ए.एस.व्ही लसींचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. सर्पदंशाच्या रुग्णावर आवश्यक असल्यास पुढील उपचारासाठी संदर्भित करण्याकरिता टोल फ्री क्र.१०८ ची रुग्णवाहिका उपलब्ध आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**देगावा (जि.सोलापूर) येथील मिनी आरोग्य केंद्र कार्यान्वित करण्याबाबत**

**(१८) ९७७७१ (२७-१२-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगाव (जि.सोलापूर) येथे सोलापूर महानगरपालिकेच्या प्रभाग "ह" मध्ये शासनाच्या योजनेतून सुमारे ६० लाख रूपये खर्च करून मिनी आरोग्य केंद्राची इमारत उभारण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिंदू नामावलीनुसार सदर मिनी आरोग्य केंद्रामध्ये पदे भरण्याचे आदेश शासनाने दिलेले असूनही अद्याप पदे भरण्यात आली नाहीत, हे ही खरे आाहे काय
(३) असल्यास, सदर आरोग्य केंद्र सुरू करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली, वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. आयुक्त, सोलापूर महानगर पालिका यांच्या अध्यक्षतेखालील सेवक वर्ग निवड समिती मार्फत मंजूर असलेली सर्व पदे (५) भरण्यात आली आहेत.
(३) देगाव, सोलापूर येथील मिनी आरोग्य केंद्र दिनांक १५/१२/२०१७ पासून कार्यरत असून दररोज २० ते ३० रुग्णांची तपासणी करुन उपचाराबाबत कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नेवासा (जि. अहमदनगर) तालुक्यात अंगणवाड्यांसाठी निकृष्ट प्रतीचा आहाराचा पूरवठा होत असल्याबाबत**

**(१९) ९७७७६ (२६-१२-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यात अंगणवाड्यांसाठी निकृष्ट प्रतीच्या धान्याचा पुरवठा होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार नेवासा तालुक्यातील अंगणवाड्यांना दर्जेदार स्वरुपाचा पोषण आहार पुरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०७-२०१८) :** (१), (२) व (३) नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील मध्यवर्ती रूग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याचा प्रस्ताव**

**(२०) ९८९८२ (०३-०१-२०१८). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील शासकीय मध्यवर्ती रूग्णालयास जिल्हा रूग्णाल्याचा दर्जा दिलेला असून तेथे कर्जत, कसारा या ग्रामीण भागातील व बदलापूर, अंबरनाथ, उल्हासनगर या शहरी भागातील रूग्ण उपचारासाठी येतात, परंतु सध्या अस्तिवात असलेल्या २०० खाटांची संख्या कमी पडत असल्याने जिल्हा शल्यचिकित्सक, उल्हासनगर-३ यांनी सदर रूग्णालय २०० खाटा वरून ३५० खाटामध्ये रूग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्यासाठी प्रस्ताव आरोग्य विभागाच्या वरिष्ठ कार्यालयास सादर केला आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर प्रस्तावाकरीता बांधकाम अंदाजपत्रके तात्काळ मिळणेबाबत शासनाच्या बांधकाम विभागाचे वरिष्ठ कार्यालयाला जिल्हा शल्यचिकीत्सक मध्यवर्ती रूग्णालय, उल्हासनगर, ३ यांनी दिनांक २८ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास कळविले आहे, हे ही खरे आहे. काय

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (१८-०९-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) नवीन रुग्णालयांना मान्यता देणे व कार्यान्वीत रुग्णालयांचे श्रेणी वर्धन करणे याबाबत सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही संचालक, आरोग्य सेवा यांचे स्तरावर सुरु असून याबाबतचा प्रस्ताव निकषानुसार बृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमआरआय मशीन उपलब्ध करून देणेबाबत

**(२१) ९९४७६ (२७-१२-२०१७). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमआरआय मशीन तातडीने उपलब्ध करून देण्याबाबतची महाविद्यालयाची मागणी/प्रस्ताव तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी देखील शासनाकडे सतत मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी एम.आर.आय मशीन उपलब्ध देण्यास सिद्धी विनायक ट्रस्टने पाच कोटी रुपये दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर एम.आर.आय मशीन न बसविल्यास काही पदव्युतर विषयांची मान्यता सुद्धा रद्द होऊ शकते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गरजू रुग्णांना रुग्णसेवा उपलब्ध करून देण्यास सदर एमआरआय मशीन शासन कधी उपलब्ध करून देणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०९-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) सदर यंत्र खरेदीस शासनस्तरावरुन प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**पाणजू (ता.वसई, जि.पालघर) या गावासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राचे उपकेंद्र मंजूर करणेबाबत**

**(२२) ९९९८० (०३-०१-२०१८). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाणजू (ता.वसई, जि.पालघर) हे भाईदर व नायगाव खाडीमधल्या बेटावर वसलेल्या गावासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राचे उपकेंद्र मंजूर होऊन बराच कालावधी झालेला असतानाही अद्यापही सदरचे उपकेंद्र अस्तित्वात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाणजू बेटावरील सदरचे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र तातडीने कार्यान्वित करण्याबाबत व तेथील रुग्णांना प्राथमिक वैद्यकीय उपचार मिळण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे. पाणजू येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र मंजूर नसून त्याठिकाणी प्राथमिक आरोग्य पथकास मंजुरी दिलेली आहे.

सदर प्राथमिक आरोग्य पथकासाठी मंडळ अधिकारी, तहसील कार्यालय, वसई यांनी उपलब्ध करुन दिलेली जमीन ही खार जमीन असल्याने सदर जागेमध्ये सपाटीकरण व संरक्षक भिंत बांधणे यासाठी येणारा खर्च इमारत बांधकामापेक्षा जास्त असल्याने पर्यायी जागेची मागणी करण्यात आलेली आहे. जागा उपलब्ध नसल्याने बांधकाम होऊ शकलेले नाही.
(२) प्राथमिक आरोग्य पथक ग्रामपंचायत पाणजू कार्यालयाच्या तळ मजल्यावर कार्यरत असून येथून दैनदिन कामकाज सुरु आहे. याठिकाणी दररोज सरासरी १४ ते १५ रुग्ण बाहयरुग्ण सेवेसाठी येत असून त्यांना रुग्ण सेवा देण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई (जि.पालघर) येथे नवीन उपजिल्हा रुग्णालय स्थापन करण्याबाबत**

**(२३) १०००० ९ (०३-०१-२०१८). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथे नवीन १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय स्थापन करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, ही संख्या तेथील रुग्णांच्या मानाने अपुरी असल्याकारणाने खाटांची संख्या वाढविण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) वसई येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय स्थापन करण्यास दि. ०९/०६/२०१४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली असून इमारतीसाठी जागा उपलब्ध करुन घेण्याबाबतची कार्यवाही जिल्हा शल्य चिकीत्सक, पालघर यांचे स्तरावर सुरु आहे. रुग्णालय कार्यान्वित झाले नसल्याने खाटांच्या संख्येमध्ये वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव विचारधीन नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबईतील विद्‌यार्थी धूम्रपान तसेच तंबाखूच्या पदार्थांच्या सेवनाच्या आहरी गेल्याबाबत

**(२४) १०११८८ (२६-१२-२०१७). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये १० ते १९ वयोगटात शिक्षण घेणाऱ्या चार विद्‌यार्थ्यांपैकी एक विद्‌यार्थी धूम्रपान तसेच तंबाखू पदार्थांच्या सेवनाच्या आहरी गेल्याची माहिती माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये वा त्या दरम्यान प्रिन्स अलीखान रुग्णालयाकडून करण्यात आलेल्या एका सर्वेक्षणात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरण गंभीर असून याबाबत ठोस कार्यवाही व प्रबोधन करण्याकरीता, शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्याची विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०८-२०१८) :** (१) नाही. अशा प्रकारचा कोणताही सर्वेक्षण अहवाल विभागास प्राप्त नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**साकोली, लाखनी व लाखांदूर (जि.भंडारा) तालुक्यातील**
**बंधाऱ्यातील कामे अपुर्ण असल्याबाबत**

**(२५) १०१५१७ (०२-०१-२०१८). श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साकोली, लाखनी व लाखांदूर (जि.भंडारा) तालुक्यात लघू पाटबंधारे स्थानिक स्तर विभाग, गोंदिया अंतर्गत ग्राम बाम्पेवाडा, किन्ही/सोनपूरी, बोदरा येथे सन २०१२-१३ मध्ये बंधाऱ्याचे बांधकाम करण्यात आले असून सदर बंधाऱ्यामध्ये पाणी अडविण्यासाठी अजुनही प्लेट्स लावण्यात आल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तिन्ही तालुक्यात लघू पाटबंधारे स्थानिक स्तर विभाग, गोंदिया अंतर्गत बांधण्यात आलेल्या बहुतेक बंधाऱ्यांवर प्लेट्स लावण्यात आले नसल्याचे माहे आक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तिन्ही तालुक्यात लघू पाटबंधारे स्थानिक स्तर विभाग, गोंदिया अंतर्गत किती बंधारे बांधण्यात आले व सदर बंधाऱ्यांवर किती निधी खर्च करण्यात आला,

(४) असल्यास, नियोजनशुन्य बांधकाम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२३-०८-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

सदर बंधाऱ्यांचे बांधकाम सन २०१६-१७ मध्ये पुर्ण झाले असून ९ बंधाऱ्यांपैकी ८ बंधाऱ्यांवर प्लेटस लावल्या आहेत.उर्वरीत सोनेखारी येथील १ बंधाऱ्याचे काम प्रगतीत असल्यामुळे सदर बधाऱ्यांच्या प्लेट्स ग्रामपंचायतीस जमा करण्यात आलेल्या आहेत.

(३) साकोली, लाखनी व लाखंदूर जि. भंडारा तालुक्यात अनुक्रमे ६, २ व १ अशी एकुण ९ बंधाऱ्यांची कामे हाती घेण्यात आली होती त्यापैकी ८ बंधाऱ्यांची कामे पुर्ण झाली असून सोनेखारी येथील १ काम प्रगतीपथावर आहे. सदर बंधाऱ्यांवर रु.१७०.८४ लक्ष रुपये खर्च करण्यात आलेला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयात विदर्भ सधन सिंचन योजनेअंतर्गत झालेल्या कामाचे**
**देयके कंत्राटदाराला मिळाली नसल्याबाबत**

**(२६) १०२०५६ (२६-१२-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये विदर्भ सधन सिंचन योजने अंतर्गत केलेल्या कामांचे देयके अदयाप पर्यंत कंत्राटदाराला मिळाले नसुन सदर योजनेचे काम दुसऱ्या योजनेमध्ये आले असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भ सधन सिंचन योजनेचा दुसऱ्या योजनेत समावेश केला असल्यास कंत्राटदाराचे देयके देण्यासंदर्भात शासनाकडुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०५-०९-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दि.१३/०६/२०१७ अन्वये मृद व जलसंधारण विभाग, बुलढाणा यांच्या एकूण ३५ योजना जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांचेकडे वर्ग करण्यात आल्या आहेत. तसेच जिल्हा परिषद (ल.पा.) विभाग, बुलढाणा यांच्या शासन लेखाशिर्ष २७०२-४७५४ अंतर्गत २७, लेखाशिर्ष २७०२-१४७९ अंतर्गत ३२ व जलयुक्त शिवार अभियान लेखाशिर्ष ४४०२-२६८१ अंतर्गत १२ अशा एकूण ७२ योजना वर्ग करण्यात आल्या आहेत.

मृद व जलसंधारण विभाग ,बुलढाणा यांचेकडे कंत्राटदाराचे देयके प्रलंबित नाहीत. तथापि,जिल्हा परिषदेची २१ देयके प्रलंबित आहेत.

(२) सन २०१७-१८ मध्ये महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांचेकडुन मृद व जलसंधारण विभाग, बुलढाणा यांना ०७ योजनांसाठी रु.५५६.८६ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.तसेच जिल्हा परिषद (ल.पा.) विभाग, बुलढाणा यांना लेखाशिर्ष ४४०२-२६८१ अंतर्गत रु.१५६.३२ लक्ष व लेखाशिर्ष २७०२-१४७९ अंतर्गत रु.१००.०० लक्ष असा एकूण रु.२५६.३२ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. उर्वरीत योजनांसाठी निधी मागणीच्या अनुषंगाने निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावरगाव (ता.निफाड, जि.नाशिक) साठवण तलावाचे काम प्रलंबित राहिल्याबाबत असल्याबाबत

**(२७) १०४८४७ (०४-०४-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावरगाव (ता.निफाड, जि.नाशिक) साठवण तलावाच्या कामास दिनांक १३ डिसेंबर २०१५ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असूनही कार्यान्वित यंत्रणेने वनजमिनीसाठी प्रस्ताव दाखल न केल्यामुळे वन विभागाच्या मान्यतेअभावी माहे जानेवारी २०१८ पर्यंत या योजनेचे काम सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेच्या वनप्रस्तावास मंजुरी, भूसंपादन व संपादीत जमिनीची मोजणी करणेसाठी मुख्य अभियंता, लघुसिंचन यांनी माहे ऑगस्ट २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे निधीची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर २०१७ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त साठवण तलावाचे काम सुरु करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१९-०९-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

यासंदर्भात शासनामार्फत संयुक्त मोजणी फी साठी निधी वितरीत करण्यात आला असून मंडळ कार्यालयामार्फत सदर निधी भूमी अभिलेख कार्यालय निफाड व चांदवड यांना अदा केलेला आहे. तालुका भुमीअभिलेख कार्यालय, चांदवड यांनी संयुक्त मोजणी पूर्ण केली असून निफाड कार्यालाकडील संयुक्त मोजणीची कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) व (५) सद्यस्थितीत वनजमिनीचा प्रस्ताव राज्य शासनाने दि.१९/४/२०१८ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास सादर केलेला आहे. वनेत्तर प्रयोजनाकरीता वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत विहीत प्रपत्रांच्या प्रस्तावास केंद्राची तत्वत: मान्यता मिळाल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

---

## पुणे, ससून सर्वोपचार रुग्णालयातच्या दुरवस्थेबाबत

**(२८) १०४९३१ (०४-०४-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे, ससून सर्वोपचार रुग्णालय हे डॉक्टर्स व कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या, शस्त्रक्रियागृहासह विविध विभाग बंद, शवागाराची दुरवस्था अशा अनेक गंभीर समस्यांनी ग्रासले असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे शवागरातून मृतदेह नातेवाईकांना आणावे लागत असून मृतदेह ठेवण्यास पुरेशी जागाही उपलब्ध नसल्याने मृतदेहांची अवहेलना होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) ससून सर्वोपचार रुग्णालयामध्ये एकूण ९ शस्त्रक्रियागृहे आहेत. तसेच ५ स्पेशल प्रोसिजर रुम्स आहेत. या सर्व सुस्थितीत कार्यरत असून, शस्त्रक्रिया गृहामध्ये दररोज सरासरी ५१ मोठी शस्त्रक्रिया व १०६ लहान शस्त्रक्रिया केल्या जातात. रुग्णालयातील सर्व विभाग सुस्थितीत सुरु आहेत. या रुग्णालयात दरवर्षी किमान ६००० शवविच्छेदन करण्यात येतात. तसेच मृतकांचे देह जतन करुन ठेवण्यासाठी ३२ क्षमता असलेले शवशीतगृह अस्तित्वात आहेत. शवविच्छेदनानंतर मृतदेह विभागातील कर्मचाऱ्यांमार्फतच शवागृहात नेले जातात व मृत व्यक्तिंच्या नातेवाईकांच्या ताब्यात दिले जातात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र शासन आरोग्यावर प्रति माणसी केवळ ७६३ रुपये खर्च करीत असल्याबाबत**

**(२९) १०५७९५ (०७-०४-२०१८). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाने सन २०१४-१५ या वर्षामध्ये आरोग्यावर प्रति माणसी केवळ ७६३ रुपये खर्च करीत असल्याने लोकांना आरोग्य सेवा घेण्यासाठी प्रति माणसी सुमारे २६८४ इतका स्वत:ला खर्च करावा लागत असल्याचे भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्रालयाने नॅशनल हेल्थ अकाऊंटस-एस्टिमेंट फॉर इंडिया यांनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये प्रसिध्द केलेल्या अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र शासन विरुध्द भूमिका घेत असून शासकीय रुग्णालयाच्या शुल्कामध्ये वाढ करुन शुल्क वाढीच्या पातळीवर अनियंत्रित खाजगी रुग्णालयाबरोबर स्पर्धा करत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या राज्यामध्ये सर्वार्थाने सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवरच अवलंबून असलेला समाज लक्षात घेता आरोग्य सेवेसाठी कमी तदतूद करण्यात येत असल्याने सर्वसामान्य लोकांच्या अर्थकारणावर ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सर्वसामान्य लोकांना आरोग्य सेवा मोफत व स्वस्त करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०३-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

(४) व (५) सर्व शासकीय रूग्णालयांमध्ये शासकीय कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित कुटुंबीय, मानसेवी वैद्यकीय अधिकारी व शासकीय रूग्णालय व दवाखान्यातील परिचर्या कर्मचारी वर्ग, वैद्यकीय, निमवैद्यकीय तसेच व्यवसायोपचार व भौतिकोपचार विद्यालयामध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थी, न्यायधिशांच्या आदेशान्वये स्थानबद्ध व्यक्ती, स्वातंत्रसंग्राम सैनिक व त्यांचे कुटुंबीय, न्यायवैद्यकीय प्रकरणात औषधोपचारासाठी पाठविलेल्या व्यक्ती व न्याय चौकशी अधिन कैदी, पोलिसांतर्फे येणा-या मेडिको लिगल केसेस, सुधारगृहातील रूग्ण, कुष्ठरोग मंडळांकडून येणारे रूग्ण, महिला सुधारगृहातील रूग्ण, नागरी विभागातील बेवारशी मुले, आश्रम शाळेतील मुले,आमदार, खासदार, मंत्री, सभापती व माजी आमदार, न्यायाधीश, वरीष्ठ नागरीक, अधिस्वीकृतीधारक पत्रकार, गरोदर माता आणि ० ते ३० दिवस वयाची नवजात अर्भक, पिवळे शिधापत्रकधारक व्यक्ती यांना विनाशुल्क आरोग्य सेवा देण्यात येतात. तसेच उर्वरीत व्यक्तींना शासकीय दराने आरोग्य सेवा पुरविण्यात येतात.
महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत राज्यातील दारीद्र रेषेखालील पिवळी शिधापत्रिकाधारक, अंत्योदय अन्न योजना, अन्नपूर्णा योजना शिधापत्रिकाधारक कुटुंबे आणि द्रारिद्ररेषेवरील (रू. १ लाखापर्यत वार्षिक उत्पन्न असलेल्या) केशरी शिधापत्रिकाधरक कुटुंबे व शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्हयातील शुभ्र शिधापत्रिकाधारक शेतकरी कुटुंबांना विमा संरक्षणाद्वारे वैद्यकीय सेवा पुरविण्यात येतात. सध्या या योजनेंतर्गत ३० निवडक विशेष सेवांतर्गत ९७१ प्रकारचे गंभीर व अधिक खर्चिक उपचार व १२१ शस्त्रक्रिया व खाजगी रूग्णालयातून रोख रक्कमरहित (कॅशलेस) वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात येतात. सदर योजनेंतर्गत वार्षिक विमा संरक्षण रक्कम प्रति वर्ष /प्रति कुटुंब रू.१.५० लक्ष एवढ्या मर्यादेपर्यंत मोफत उपचार अनुज्ञेय आहेत.

---

**पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) येथील उपजिल्हा रूग्णालयाचे काम निधीअभावी प्रलंबित राहिल्याबाबत**

**(३०) १०६२७९ (०७-०४-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) येथील सन २०११ मध्ये भूमीपुजन करण्यात आलेल्या १०० खाटांच्या उपजिल्हा रूग्णालयाच्या इमारतीचे काम निधीअभावी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत वारंवार बैठका होऊनसुध्दा अद्यापपर्यंत सदर रूग्णालयाचे काम अर्धवट स्थितीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी करून उपजिल्हा रूग्णालयाचे काम पूर्णत्त्वास नेण्यासाठी तातडीने निधी उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०९-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.
सद्य:स्थितीत पनवेल उपजिल्हा रुग्णालय व ट्रामा केअर युनिटचे बांधकाम ८५ टक्के पुर्ण झालेले असून काम प्रगतीप्रथावर आहे.
(३) सदर उपजिल्हा रुग्णालयाचे काम पुर्णत्वास नेण्यासाठी उर्वरित कामाचे रु.२९२.३९ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रकास शासन निर्णय दि.१०/४/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असुन आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## राज्यात अल्झायमर आणि स्मृतिभ्रंस रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्याने मेमरी क्लिनिक सुरु करण्याचा निर्णय

**(३१) १०७६२४ (३१-०३-२०१८). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अल्झायमर आणि स्मृतीभ्रंशाच्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्याने राज्यातील जिल्हा रुग्णालयांमध्ये "मेमरी क्लिनिक" सुरु करण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०१८ च्या पहिल्या आठवडयात घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक, ठाणे आणि सिंधुदुर्ग येथे उपरोक्त रुग्णांसाठी "डे केअर सेंटर" सुरु करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय, अद्यापही याची अंमलबजावणी झाली नसल्यास, यासाठी किती कालावधी लागणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०९-२०१८) :** (१) व( २) हे खरे आहे.
(३) राज्यातील पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक, ठाणे आणि सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयांमध्ये "मेमरी क्लिनिक" दिनांक १ जून, २०१८ पासून सुरु करण्याबाबत संबंधित जिल्हा शल्य चिकीत्सकांना कळविण्यात आले आहे.

संबंधित जिल्हयांना सदर कार्यक्रमांसाठी पी.आय.पी-२०१८ अंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याकरिता केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असून या कार्यक्रमासाठी प्रादेशिक मनोरुग्णालय, ठाणे येथील २ मनोविकार तज्ञांना नोडल ऑफीसर म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. या कार्यक्रमासाठी अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

### ठाणे सिव्हील रुग्णालयात लहान मुलांसाठी व्हेंटिलेटर नसल्याबाबत

**(३२) १०९२७९ (०१-०४-२०१८). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे सिव्हील रुग्णालयात लहान मुलांसाठी आवश्यक व्हेंटिलेटर नसल्याची बाब दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, शासनाने उक्त रुग्णालयात त्वरीत व्हेंटिलेटरचा पुरवठा करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) जिल्हा रुग्णालय, ठाणे येथील नवजात शिशु उपचार कक्षासाठी एक आणि अन्य रुग्णालयांसाठी २२ असे २३ नग निओनेटल व्हेंटीलेटर खरेदी करण्यासाठी हाफकीन जीव-औषध निर्माण महामंडळाकडून निविदा प्रसिध्द करण्यात आलेली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रामटेक (जि.नागपूर) तालुक्यातील माजी मालगुजारी तलावाचे पुर्नजीवन करण्याबाबत

**(३३) १११३८२ (०४-०४-२०१८). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) तालूक्यातील ५२ माजी मालगुजारी तलावातील गाळ काढणे व तलावाची दुरुस्ती करण्यासंबंधी शासनाकडे मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलावातील गाळ काढून तलाव दुरुस्ती करण्यासंबंधी शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(३) अद्यापी कार्यवाही झाली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१३-०८-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) जिल्हा परिषद विभाग, नागपूर अंतर्गत रामटेक तालुक्यात ६९ माजी मालगुजारी तलाव आहेत. त्यापैकी जिल्हा परिषद विभागाद्वारे सन २०१६-१७ मध्ये २० माजी मालगुजारी तलावांचे पुनर्बांधनी व बळकटीकरणाचे काम पुर्ण झाले असून २०१७-१८ मध्ये ६ कामे प्रगतीपथावर आहेत.

तर मृद व जलसंधारण विभागाद्वारे ७ माजी मालगुजारी तलावांचे पुनर्बांधणी व बळकटीकरणाचे काम नियोजनात होते. त्यापैकी ६ कामे पुर्ण झालेली असून उर्वरीत १ काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात जलयुक्त शिवार योजनेच्या प्रस्तावित कामांसाठी नवीन दरसूची लागू करणेबाबत

**(३४) १११४७१ (०४-०४-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जलयुक्त शिवार योजनेच्या प्रस्तावीत कामांना दिनांक ३१ डिसेंबर २०१७ पूर्वी नविन दर सुची लागू करण्यात येईल अशी घोषणा मा. जलसंधारण मंत्री यांनी दिनांक १४ डिसेंबर २०१७ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात अद्यापही नविन दरसुची लागू झालेली नसल्याने जलयुक्त शिवार व जलसंधारणाच्या कामांची अंदाजपत्रके तयार करण्यास अनेक अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१३-०८-२०१८) : (**१) होय. हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. मृद व जलसंधारण विभागाची सन २०१७-१८ ची दरसूची दिनांक २६/१२/२०१७ पासून लागू करण्यात आली आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाशिम जिल्हयात टीएचआर (टेक होम रेशन) योजनेतंर्गत पूरविण्यात येणाऱ्या पोषण आहाराच्या पाकीटावर उत्पादनाचा दिनांक व बॅच नंबर नसल्याबाबत

**(३५) १११५४६ (१०-०४-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयात टीएचआर टेक होम रेशन योजनेअंतर्गत अंगणवाडीतील बालके गरोदर आणि स्तनदा मातांना पुरविण्यात येणाऱ्या पोषण आहाराच्या पाकीटावर उत्पादन दिनांक व बॅच नंबर नसल्यामुळे सदर प्रकरण आयुक्त, महिला व बालकल्याण विभाग यांच्याकडे सादर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोषण आहार पाकिटावर उत्पादनाच्या दिनांक व बॅच नंबर टाकण्या बाबत आयुक्त, महिला व बालल्याण विभाग यांनी कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०७-२०१८) :** (१) होय.

(२) भक्ती महिला बचतगट यांनी Food Safety Standards (Packaging & Labelling) Regulations २०११ मधील नियमाचा भंग केल्यामुळे त्यांचेवर सदरहू

कायद्यानुसार दंडात्मक कार्यवाही करुन दंडाची रक्कम संबंधीत बचत गटाच्या देयकामधून कपात करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मृदसंधारण विभागात कामात झालेला गैरव्यवहार

**(३६) १११७४१ (१०-०४-२०१८). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मृदसंधारण विभागातील १०० कोटी रुपयाच्या कामामध्ये गैरव्यवहार झाला असून कृषी आयुक्तालयाने या गैरप्रकारप्रकरणी ९४ अधिकाऱ्यांना माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान नोटीसा पाठविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, या प्रकरणी दोषी असणाऱ्या संबंतिधतांवर कोणती कारवाई केली वाकरण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०७-०९-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) व (३) होय.
प्रस्तुत प्रकरणी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने कृषि विभागाच्या दक्षता पथक, कृषि आयुक्तालय, पुणे यांचेमार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे. सदर अहवालानुसार निदर्शनास आलेल्या अनियमिततांच्या अनुषंगाने संबधित अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच प्रकरणातील संबधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सातारा यांना दि. २०/१२/२०१७ रोजी निलंबित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदुरा (जि.बुलढाणा) तालुक्यातील शिवगंगा नदीवर बांधण्यात आलेल्या कोल्हापूरी बंधाऱ्यातून पाण्याची गळती होत असल्याबाबत

**(३७) ११२७४१ (१०-०४-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदुरा (जि.बुलढाणा) तालुक्यातील शिवगंगा नदीवर अनेक वर्षापासून ठिकठिकाणी बांधण्यात आलेल्या कोल्हापूरी बंधाऱ्यातून पाण्याची गळती होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२९-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे. तथापि, सदर बंधारे हे शिवगंगा नदीवर नसून विश्वगंगा नदीवर आहेत.
(२) जिल्हा जलसंधारण अधिकारी (ल.पा.) जिल्हा परिषद, बुलडाणा यांच्या अहवालानुसार मौजे औरंगपुर व मौ.तांदुळवाडी येथील बंधाऱ्यावर गळती आढळुन आली. त्यानुसार मौ.तांदुळवाडी येथील कोल्हापूरी बंधारा दुरुस्तीचे काम जलयुक्त शिवार अभियान सन २०१५-१६ मधुन पूर्ण झाले असून मौ.औरंगपुर येथील काम जि.प. सेस फंड मधुन प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर कामास कार्यारंभ आदेश देण्यात आले असून लवकरच काम पूर्ण करण्यात येईल.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील ग्रामीण भागातील अंगणवाडी केंद्रास पुरवठा करण्यात आलेला आहार निकृष्ट दर्जाचा असल्याबाबत**

**(३८) ११३०४७ (१०-०४-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील ग्रामीण भागातील ० ते ६ वयोगटातील मुले अंगणवाडी केंद्राच्या माध्यमातून कुपोषणमुक्त करण्याकरिता गरोदर व स्तनदा मातांना सकस आहार देण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महिला व बाल कल्याण विभागामार्फत अंगणवाडीना पोषण आहार पुरवठा करणा-या कंत्राटदारामार्फत पुरवठा करण्यात येत असलेला आहार अत्यंत निकृष्ट दर्जाचा असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, तद्नुसार अंगणवाडीना निकृष्ट दर्जाचा पोषण आहार पुरविणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०७-२०१८) :** (१) होय.
(२), (३) व (४) नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अक्राळे (ता.दिंडोरी जि. नाशिक) येथील पाझर तलावासाठी संपादित केलेल्या जमिनीस बाजारभावाप्रमाणे मूल्य देण्याबाबत**

**(३९) ११३७९२ (०७-०४-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्राळे (ता.दिंडोरी,जि.नाशिक) येथील १० शेतक-यांची १० हेक्टर जमिन सन १९९६ मध्ये पाझर तलावासाठी संपादित केली होती मात्र सदर जमिनीस बाजारभावाप्रमाणे शेतक-यांना मूल्य देण्याचे न्यायालयाने आदेश देवूनही मूल्य देण्याचे टाळल्याने कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, नाशिक यांना पदावरुन हलविण्यात आल्याचा प्रकार माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित प्रकल्पगस्त शेतक-यांना बाजारभावाप्रमाणे मुल्य तात्काळ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२३-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे चांडोळ व इरला (ता.जि.बुलढाणा) येथे पाझर तलाव व कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याच्या दुरूस्ती कामात झालेला गैरव्यवहार**

**(४०) ११४२६१ (०४-०४-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चांडोळ व इरला (ता.जि. बुलडाणा) येथे जिल्हा परिषद सिंचन विभागामार्फत पाझर तलाव व कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याच्या दुरूस्तीचे कामाच्या अंदाजपत्रकात वाढ करून गैरव्यवहार केल्याचे जिल्हा परिषद सदस्य यांनी लेखी तक्रार मुख्य कार्यकारी अधिकारी, बुलढाणा यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय

(३) असल्यास, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०५-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोंदिया जिल्यात कुपोषणाग्रस्त बालकांच्या संख्येत होणारी वाढ

**(४१) ११५७१६ (३१-०३-२०१८). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कुपोषणाचे प्रमाण रोखण्यासाठी कोट्यावधी रुपये शासन खर्च करीत असतानाही गोंदिया जिल्यात कुपोषणाग्रस्त बालकांची आकडेवारी कमी न होता वाढत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयात डॉ.अब्दुल कलाम पोषण आहार योजनेची योग्य प्रकारे अंमलबजावणी न झाल्यामुळे कुपोषणाचा आकडा ६२०७ वर पोहोचला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास. शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार डॉ. अब्दुल कलाम पोषण आहार योजनेची अमंलबजावणी योग्यप्रकारे करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०७-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

गोंदिया जिल्हयामध्ये डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना ही ५ तालुक्यांमधील ४१८ अंगबणवाडी व ६३ मिनी अंगणवाडीमध्ये राबविण्यात येत आहे.

कालावधी कमी वजनाची बालके तीव्र कमी वजनाची बालके

| कालावधी | कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची बालके |
|---|---|---|
| मार्च-२०१५ | २८२२ | ५३३ |
| जानेवारी-२०१८ | ११४४ | २६५ |

वरील तपशील पाहता मार्च,२०१५ च्या तुलनेत जानेवारी २०१८ मध्ये कमी वजन व तीव्र कमी वजनाच्या बालकांमध्ये सुधारणा झालेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत कामे प्रलंबित असल्याबाबत

**(४२) ११७५३९ (३१-०७-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून मागिल तीन वर्षात १६ हजार ५२१ गावांची निवड करण्यात आली असुन त्यापैकी ११ हजार २४७ गावे जलपरिपूर्ण झाली असुन उर्वरित गावे माहे जून, २०१८ पर्यत जलपरिपूर्ण करावीत व पुढील वर्षासाठी निवड करण्यात आलेल्या ६,२०० गावांमध्ये जलयुक्त शिवाराची कामे तातडीने सुरु करण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री यांनी माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास,या योजनेच्या अंमलबजावणीची गती मंदावल्यामुळे अनेक कामे पूर्ण होत नसल्याने मा.मुख्यमंत्री यांनी संबधित अधिका-यावंर कारवाई करण्याचे निदेश देखील दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यात आलेल्या बैठकीत देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने जलयुक्त शिवार योजना राबविण्यासाठी निवड केलेल्या एकूण कामापैकी प्रत्यक्षात किती कामे पूर्ण झाली आहेत व किती कामे प्रलंबित आहेत,

(४) असल्यास, जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत प्रलंबित कामामुळे नागरिकांची प्रामुख्याने शेतक-यांची गैरसोय होत असल्याने अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत तसेच सदर कामात दिरंगाई करणा-या संबधितावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-०८-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३), (४) व (५) निवडलेल्या सर्व गावात कामे सुरू होती. मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने शासन पत्र दि.१२/४/२०१८ व दि.२६/४/२०१८ अन्वये संबंधित यंत्रणांना कार्यवाही करणेबाबत सूचना देण्यात आल्या. त्यानुसार जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१५-१६ ते सन २०१७-१८ पर्यंत निवडलेल्या गावांमध्ये एकुण ५,६०,५१७ कामांपैकी ५,३३,७४५ कामे म्हणजेच ९५ टक्के कामे पुर्ण झाली असुन २६,७७२ कामे प्रगतीपथावर आहेत. अभियानांतर्गत सन २०१५-१६ ते सन २०१७-१८ मध्ये निवडलेल्या १६,५२१ गावांपैकी १३,७६४ गावे जलपरिपुर्ण झाली आहेत.

तसेच जलयुक्त शिवार अभियान सन २०१७-१८ चा कालबद्ध कार्यक्रमानुसार कार्यवाही न केलेल्या संबंधितांकडून शासन ज्ञापन दि.२७/४/२०१८ अन्वये खुलासे मागविण्यात आले असून याबाबत पुढील कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.

---

## धुळे जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत असलेली प्रलंबित कामे

**(४३) ११८५७५ (३१-०७-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत तिस-या टप्प्यात (सन २०१७-२०१८) जिल्हा परिषदेच्या लघुसिंचन विभागातर्फे ४३१ कामे केली जाणार असून सदर कामे माहे मार्च,२०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे निदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयात नाला खोलीकरणाची ६९ कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार सदर प्रलंबित कामे तातडीने पुर्ण करण्यासह कामे प्रलंबित ठेवणाऱ्या संबंधित अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२८-०८-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

धुळे जिल्ह्यात जलयुक्त शिवार योजना सन २०१७-१८ मध्ये जिल्हा परिषदेच्या लघुसिंचन विभागामार्फत एकुण ४२९ कामांपैकी ३५९ कामे पुर्ण झाली असून उर्वरीत ७० कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) हे खरे नाही.

धुळे जिल्हयात नाला खोलीकरणाच्या एकूण ७७ कामांपैकी ६६ कामे पूर्ण झाली असून उर्वरित ११ कामे प्रगतीपथावर आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सातारा जिल्हयातील जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत कामे प्रलंबित असल्याबाबत

**(४४) ११९०९५ (३१-०७-२०१८). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत करावयाची ४०० कामे गेल्या वर्षभरापासून प्रलंबित असल्याने तेथील जनतेला टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलयुक्त शिवार योजनेची कामे प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१६-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

सातारा जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१५-१६ ते सन २०१७-१८ मध्ये एकुण १७,३६७ कामांपैकी १६,२६५ कामे म्हणजेच जवळजवळ ९४ टक्के कामे पुर्ण झाली असून ११०२ कामे प्रगतीपथावर आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील मुख्य वनसंरक्षक प्रदेशिक कार्यालया मार्फत वनरक्षक भरती प्रक्रिया नियमबाहय पध्दतीने राबविण्यात आल्याबाबत**

**(४५) ११९८९८ (३१-०७-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील मुख्य वनसंरक्षक प्रदेशिक कार्यालया मार्फत सन २०१७ मध्ये वनरक्षक भरती प्रक्रिया नियमबाहय पध्दतीने राबविण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ च्या तिस-या आठवडयात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भरती प्रक्रियेमध्ये रातआंधळेपणाचा नियमाकडे दुर्लक्ष करुन वनरक्षकाची नियुक्ती करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भरती प्रक्रियेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-१०-२०१८) :** (१) अमरावती वनवृत्तातील सन २०१६ च्या वनरक्षक पदाच्या भरतीप्रक्रियेत निवडयादीतील उमेदवारांची शारिरीक व वैद्यकीय तपासणी करुन पात्र उमेदवारांनाच वनरक्षक पदावर मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कार्यालयामार्फत नियुक्ती देण्यात आली आहे. तथापि, दि.०७.०४.२०१८ च्या प्राप्त तक्रारीतील उपस्थित बाबींवर संबंधितांना फेर वैद्यकीय तपासणीकरीता वैद्यकीय मंडळ, यवतमाळ यांच्याकडे पाठविण्यात आले असून वैद्यकीय मंडळाचा अहवाल अद्यापी अप्राप्त आहे.

(२) नाही,

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेंतर्गत झालेले काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(४६) १२०२१५ (३१-०७-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत जलसंधारण विभागा मार्फत करण्यात आलेली ३ आणि जिल्हा परिषद मार्फत करण्यात आलेली ४ कामे निकृष्ट दर्जाचे झाली असल्याबाबतची तक्रार जिल्हाधिकारी,हिंगोली यांच्याकडे करण्यात आली असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी हिंगोली यांनी याप्रकरणी चौकशीचे आदेश देऊन निकृष्ट दर्जाचे काम करणा-या कंत्राटदार व अभियंतावर कारवाई करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित कंत्राटदार व अभियंतावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१६-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील सेंटजॉर्ज व सर जे.जे. रुग्णालयात अंशकालीन महिला कर्मचा-यांना सेवेत कायम करण्याबाबत

**(४७) १२०३४२ (२८-०७-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील सेंट जॉर्ज व सर जे.जे. रुग्णालयात अंशकालीन पदे कायम भरण्याचा आकृतीबंध मंजूर असतानाही गेले १५ ते २० वर्षापासून रुपये ४५० इतक्या अल्प वेतनावर काम करणा-या सहा अंशकालीन महिलांना सेवेत कायम करणेबाबत अनेक लोकप्रतिनिधींनी लेखी पत्र देवूनही अद्याप सदरहू महिलांना शासनाने सेवेत कायम केले नसल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने माहे एप्रिल २०१६ मध्ये जे.जे. रुग्णालयातील ७७४ बदली कर्मचा-यांना सेवेत कायम केले असताना उक्त सहा अंशकालीन महिलांना अद्याप सेवेत कायम न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त अंशकालीन कर्मचा-यांच्या वाढत्या वयामुळे त्यांना इतरत्र नोकरी मिळणार नसल्याने तसेच सद्याच्या महागाईच्या काळात कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविणे कठीण होत असून गेले १५ ते २० वर्षापासून अल्प वेळ सेवा असूनही पूर्णवेळ काम करणा-या सदरहू कर्मचा-यांना त्वरीत सेवेत कायम करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-१०-२०१८) : (**१) हे खरे आहे.
(२) माहे एप्रिल २०१६ मध्ये जे.जे. रुग्णालयातील ७७४ बदली कर्मचाऱ्यांना सेवेत कायम केल्याची बाब खरी नसून शासन निर्णय दि.७.१२.२०१५ अन्वये राज्यातील सर्व संस्थांमध्ये कार्यरत असलेल्या चतुर्थश्रेणीतील ६२६ बदली कर्मचाऱ्यांच्या सेवा वर्ग-४ च्या पदावर नियमित करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णय हा वर्ग-४ च्या पदावर २९ दिवस बदली काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत आहे. मुंबईतील सेंट जॉर्ज व जे.जे. रुग्णालयात एकूण ६ अंशकालीन कर्मचारी काम करत असून त्यांना सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक दि.२५.०८.२००५ अन्वये पूर्णकालीन लिपीक पदावर सामावून घेता येणार नाही.

(३) सुशिक्षित बेरोजगारांना त्यांचा नोकरी शोधण्यासाठी येणारा खर्च भागविता यावा यासाठी सन १९७९ पासून सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य ही योजना राबविण्यात येत होती. या सुशिक्षित बेरोजगारांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क पदावरील सरळसेवेने करावयाच्या नियुक्तीसाठी १० टक्के समांतर आरक्षण लागू केले असून या पदावर सरळसेवेने शासन सेवेत येण्यासाठी कमाल वयोमर्यादा ४६ वर्षापर्यंत शिथीलता देण्यात आली आहे. तसेच अंशकालीन उमेदवारांना शासन सेवेत थेट सामावून घेण्याबाबत शासनाचे कोणतेही धोरण नाही. सदर कर्मचारी पूर्णवेळ कर्मचारी नसल्याने त्यांना समान काम समान वेतन हे धोरण सुध्दा लागू होत नाही. त्यामुळे अंशकालीन कर्मचाऱ्यांना शासन सेवेत थेट सामावून घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयात जलयुक्त शिवार व मृदसंधारणाच्या कामस मंजूर झालेल्या निधीचा पूर्ण विनियोग न झाल्याबाबत

**(४८) १२३१६९ (३१-०७-२०१८). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात कृषी विभागाकडून करण्यात येणा-या जलयुक्त शिवार व मृदसंधारणाच्या अपूर्ण कामसह इतर कामांसाठी १३ कोटी रुपये इतक्या निधीची तरतूद केलेली असताना केवळ ६९.४४ लाख रुपये एवढाच निधी दिनांक ३१ मार्च,२०१८ पर्यत खर्च करण्यात आले असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे का ,

(२) असल्यास, सदरहू मंजूर निधी खर्च न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानूसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२४-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रशासकीय मंजूरी तसेच कार्यारंभ आदेश देऊनही ठेकेदारानी विहीत वेळेत कामे सुरु न केलेमुळे माहे मार्च अखेर खर्च करणे शक्य झाले नाही. त्यामुळे निधी समर्पित करण्यात आला.

(३) व (४) जलयुक्त शिवार अभियान सन २०१७-१८ चा आराखडा ४३४ कामे २३०० लाख वरुन २१५ कामे ३७५ लाख इतका निधी कमी झाल्यामुळे जिल्हा वार्षिक योजनेचा निधी पूनर्विनियोजित करण्यात आला.

त्यानुषंगाने जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, कोल्हापूर यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ नुसार विभागीय चौकशी प्रस्तावित करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात सफाईदार या पदासाठी कामगारांच्या वारसास नोकरीत सामावून घेण्याबाबत**

**(४९) १२३८११ (२५-०७-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात सफाईगार या पदासाठी १९ कामगारांनी त्यांच्या वारसास नोकरीत सामावून घेण्यासाठी निवृत्तीनंतरच्या एक वर्षाच्या आत अर्ज दिले नसल्यामुळे त्यांच्या वारसांना नेमणुकीचे अर्ज प्रलंबित ठेवण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पध्दतीने नेमणुक देण्याच्या कार्यपध्दतीत अनेक अडचणी असल्यामुळे सफाईगार कर्मचा-यांच्या वारसांना नोकरीपासून वंचित रहावे लागले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदर रुग्णालयात सफाईदार कर्मचा-याच्या निवृत्तीनंतर त्यांच्या वारसांना एक वर्षाच्या आत अर्ज करण्याची अट शिथिल करुन सफाईगार कर्मचा-यांना वारसांना नोकरीत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-१०-२०१८) :** (१) व (२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन परिपत्रक दि.२१.१०.२०११ व दि. २६.२.२०१४ अन्वये सफाई कामगारांच्या वारसांनी नियुक्ती मिळण्यासाठी एक वर्षाच्या मुदतीत अर्ज करण्याची अट घातलेली आहे. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथील ज्या कामगारांच्या वारसांनी एक वर्षाच्या मुदतीनंतर अर्ज केलेले आहेत त्यांना नियुक्ती देणे शक्य होत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सदर रुग्णालयातील सफाईगार कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीनंतर त्यांच्या वारसांना एक वर्षाच्या आत अर्ज करण्याची अट शिथील करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगरुळपीर (जि.वाशिम) तालुक्यात जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत बांधण्यात येणा-या बंधा-याच्या कामाबाबत**

**(५०) १२४४०५ (३१-०७-२०१८). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगरुळपीर (जि.वाशिम) तालुक्यातील कोठारी शिवारात जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत जिल्हा परिषद, लघु सिंचन उप विभाग द्वारा तीन बंधारे बांधण्यासाठी २५ लाख रुपये किंमतीचे कंत्राट देण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू तिन्ही बंधा-यांचे काम झाले नसून त्याचे कच्चा मालाचे साहित्य तेथील शेतात अस्ताव्यस्त पडले असल्याने शेतकरी त्रस्त झाले असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार सदरहू बंधारे पूर्ण करून घेण्यासह सदर कामाचे कंत्राट दिलेल्या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१६-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

बंधाऱ्याच्या खोदकामातून उपलब्ध साहित्य तसेच बांधकामास आवश्यक साहित्याची योग्य विल्हेवाट लावण्याची कार्यवाही कंत्राटदारा मार्फत करण्यात आली आहे.
(३) व (४) होय.

सदर कामातील सिं.ना.बांध क्र.०१ चे बांधकामा दरम्यान वापरण्यात येत असलेले साहित्य हे निकृष्ठ दर्जाचे असल्याचे आढळून आले असल्याने कार्यकारी अभियंता यांनी त्यांचे पाहणी दरम्यान सिं.ना.बांध क्र.०१ चे निकृष्ट दर्जाचे काम तोडुन टाकुन गुणवत्तापुर्ण साहित्याने बंधारा पुन:बांधण्याचे आदेश दिले तरीदेखिल कंत्राटदाराने सिमेंट नाला बंधाऱ्याचे काम गुणवत्तापुर्ण, मुदतीत पुर्ण केले नसल्याने कंत्राटदाराची सुरक्षाठेव जमा करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत जलयुक्त शिवार अभियान सन २०१५-१६ ची मुदत संपल्याने ही कामे म.ग्रा.रो.ह.यो अंतर्गत प्रस्तावित करुन पुर्ण करुन घेण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.